# परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी गोपींना केलेले मार्गदर्शन

## (व्यष्टी आणि समष्टी साधना)

## अनुक्रमणिका

( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )


**१. प.पू. डॉक्टरांच्या शिकवण्याच्या विविध पद्धती** १२

* वागण्यातून (अप्रत्यक्ष) शिकवणे १२
* विचारप्रवृत्त करणे १९
* निरीक्षण आणि प्रयोग यांतून शिकवणे २३

**२. साधना** २४

* चुकांविषयी दृष्टीकोन देणे २७
* स्पर्धेपेक्षा एकमेकांचे अनुकरण करणे चांगले ! ३५
* परेच्छेपेक्षा ईश्वरेच्छा अधिक महत्त्वाची ! ४१
* साधक आणि सिद्ध यांच्यातील भेद सांगणे ४४
* गोपींसमोर साधनेतील ध्येय ठेवणे ४५

**३. कृष्णाकडे जायला शिकवणे** ४८

* प.पू. डॉक्टरांनी त्यांच्या अनुसंधानात असलेल्या साधिकेला श्रीकृष्णाशी बोलायची सवय लावून त्याच्या भक्तीची ओढ लावणे आणि सगुण भक्तीकडून निर्गुण भक्तीकडे नेणे ४९
* अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत असलेला एक साधक कृष्णासमवेत आनंद अनुभवत असून अनुकूल स्थिती असूनही साधक कृष्णाकडे जात नाहीत, असे प.पू. डॉक्टरांनी सांगणे ५३

**४. कृष्णभक्तीतील पैलू शिकवणे** ५४

* द्वापरयुगातील गोपींनी कशी भक्ती केली, हे शिकवण्यासाठी प.पू. डॉक्टरांनी गोष्ट सांगणे ५४
* श्रीकृष्णाप्रती भक्ती वाढवण्यासाठी श्रीकृष्णाला प्रार्थना केल्यावर प.पू. डॉक्टरांनी 'रासलीला' हा ग्रंथ वाचून भक्ती आणि ज्ञान यांच्या स्तरावर साधना करण्याचा निरोप देणे ५८
* गोपी दीपालीमधील भाव आणि जिज्ञासा यांमुळे प.पू. डॉक्टरांनी उलगडलेले भक्त अन् भगवंत यांच्यातील अतूट नाते ! ६१

**५. सगुण-निर्गुण नाही भेदाभेद !** ६१

* गुरूंचा देह सगुण रूप आणि गुरुतत्त्व हे निर्गुण तत्त्व असणे अन् गुरूंच्या देहात गुरुतत्त्व येऊन कार्य करत असणे ६२
**६. गोपींना समष्टी सेवेकडे वळवणे** ६३
* समष्टी साधना केल्यावरच श्रीकृष्णाशी एकरूप होऊ शकणार असल्याचे प.पू. डॉक्टरांनी सांगणे ६६
* गोपींसमोर भारतभर कृष्णभक्तीचा प्रसार करण्याचे उद्दीष्ट ठेवणे ६८
**७. गोपींना समष्टी सेवेसाठी सिद्ध करणे** ६९
* कोणीही कोणताही प्रश्न विचारला, तर उत्तर देता यावे; म्हणून प.पू. डॉक्टर गोपींना प्रश्न विचारून शिकवत असणे ६९
* गोपी तृप्तीमध्ये नेतृत्वगुण निर्माण होऊ लागल्याचे पाहून 'कृष्ण मिळाला की, सगळे मिळते', असे प.पू. डॉटरांनी सांगणे ७२
**८. प.पू. डॉक्टरांनी 'हिंदु राष्ट्राच्या स्थापने'साठी अविरत प्रयत्न करूनही नामानिराळे रहायचे कसे, याचा स्वतःचे उदाहरण अप्रत्यक्षपणे देऊन बोध देणे** ७३
**९. प.पू. डॉक्टरांनी गोपींना दिलेल्या शिकवणीची फलनिष्पत्ती : गोपी समष्टी साधना करू लागणे आणि सर्वच गोपींना व्यष्टी साधनेपेक्षा समष्टी साधनेत अधिक आनंद मिळू लागणे** ७५

# मनोगत

'ईश्वराने कृष्णभक्तीचा प्रसार करण्यासाठी सनातन संस्थेला द्वापरयुगातील गोपींप्रमाणे या कलियुगात गोपी दिल्या. रत्नपारख्याला हिऱ्याच्या खाणीतून मिळवलेल्या मातीतून हिरे शोधून काढावे लागतात, त्याप्रमाणे प.पू. डॉक्टरांनी सनातनच्या साधकांतून ईश्वराने दिलेल्या गोपीभावातील साधिकांना शोधून काढले. हिऱ्याच्या खाणीतून हिरे जरी मिळवले, तरी त्यांना पैलू पाडावे लागतात. तेव्हाच ते चमकू लागतात, म्हणजे तेजस्वी बनतात आणि मग त्यांना मोल येते. प.पू. डॉक्टरांनी ईश्वराने दिलेल्या गोपींना प्रसंगानुरूप मार्गदर्शन केले. ते त्यांनी गोपींच्या गुणांना पैलू पाडण्यासारखेच आहे ! त्यांनी केलेले हे मार्गदर्शन म्हणजेच त्यांनी गोपींना दिलेली शिकवण. गोपींनी ती त्या त्या वेळी लिहून ठेवली.

या ग्रंथात गोपींना मिळालेली शिकवण वाचल्यास लक्षात येईल की, प.पू. डॉक्टरांनी गोपींना व्यष्टी साधनेमध्ये परिपूर्ण बनवण्यासाठी साधनेचे वेगवेगळे पैलू शिकवले, उदा. व्यवस्थितपणा, चुकांविषयीचे दृष्टीकोन, अहं त्यागणे, नामजपाद्वारे देवाशी अनुसंधान ठेवणे, दुसऱ्यांकडून सातत्याने

शिकणे, ईश्वरेच्छेने वागणे इत्यादी. गोपींनी गुरूंप्रतीच्या भावामुळे गुरूंच्या देहात, म्हणजे सगुणात अडकू नये; म्हणून त्यांना सातत्याने 'श्रीकृष्णामुळे झाले, श्रीकृष्णाने केले, श्रीकृष्णाने शिकवले', असे म्हणायला शिकवून आणि श्रीकृष्णाप्रती भाव निर्माण करून श्रीकृष्णाकडे, म्हणजे निर्गुणाकडे जायला शिकवले. प.पू. डॉक्टरांनी गोपींना केवळ व्यष्टी साधना न शिकवता समष्टी साधनेचे, म्हणजे समाजाला सात्त्विक बनवण्यासाठी समाजात जाऊन अध्यात्मप्रसार करण्याच्या साधनेचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवले. एवढेच नव्हे, तर त्यांना त्या साधनेसाठी सिद्धही केले. अशा प्रकारे व्यष्टी आणि समष्टी या दोन्ही साधना शिकवून गोपींचा साधनेतील प्रवास परिपूर्णत्वाकडे नेला.

प.पू. डॉक्टरांनी 'गोपींना केव्हा काय शिकवायचे ?' हे काही ठरवून केलेले नाही; पण त्यांनी शिकवलेल्या सर्व सूत्रांचे संकलन केल्यावर लक्षात आले की, त्यांनी दिलेली शिकवण ही एखाद्याला साधनेच्या अंगाने घडवण्यासाठी, म्हणजेच ईश्वरप्राप्तीसाठी किती परिपूर्ण आहे ! प.पू. डॉक्टर परात्पर गुरु असल्याने त्यांची शिकवण, म्हणजेच ईश्वराची शिकवण आणि ती परिपूर्ण असणारच ! हेच गुरूंचे महत्त्व आहे.

प.पू. डॉक्टरांनी गोपींना दिलेल्या शिकवणीप्रमाणे श्रीकृष्णकृपेने गोपींची समष्टी साधना चालू झाली आहे आणि त्या दायित्व घेऊन सेवा करू लागल्या आहेत. हेच प.पू. डॉक्टरांच्या शिकवणीचे फलित आहे. या शिकवणीचा लाभ श्रीकृष्णकृपेने इतर साधक, तसेच जिज्ञासू यांनाही होवो आणि जिज्ञासू साधक बनून त्यांच्याकडून हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी समष्टी सेवाही घडो, ही श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना !'

**- (पू.) डॉ. मुकुल माधव गाडगीळ**